# श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

***विश्व तंबाखू निषेध दिवस (दि. ३१.०५.२०२१)***

---

**- प्रकाशित बातमी –**


आपल्या तालुक्यातील प्रत्येक बातमी
जनसामान्यांचे हक्काचे व्यासपिठ
e-EDITION
साप्ताहिक
वऱ्हाड दर्शन
दि. ०२ जुन २०२१
कार्यालय - मिराई प्रिंटर्स
सहकार नगर, बनोसा-दर्यापूर ४४४८०३
Gmail - ravi85nawalkar@gmail.com
संपादक - रवि एच. नवलकार
9527414139 / 9021677302
मुलगी वाचवा... मुलगी शिकवा....


# श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयातर्फे विश्व तंबाखू निषेध दिवसा निमित्य जनजागृती कार्यक्रम संपन्न

अंजनगाव सुर्जी : प्रतिनिधी

जागतिक आरोग्य संघटनेतर्फे दरवर्षी ३१ मे हा दिवस विश्व तंबाखू निषेध दिवस म्हणून विविध संकल्पना राबवुन पाळण्यात येतो. यावर्षी हा दिवस कमिट टु क्विट म्हणजेच सोडण्याचे वचन द्या ह्या संकल्पनेतुन पाळण्यात आला. भारतात तंबाखू सेवन हे अधिक करून धुम्रपानातून होतं. ज्या व्यक्ती धुम्रपान करतात त्यांना तंबाखूचे दुष्परिणाम तर भोगावे लागतातच, परंतु त्यांच्या आसपास वावरणाऱ्या व्यक्तींच्या शरीरातही तो तंबाखूजन्य धूर जाऊन त्या निष्पाप व्यक्तीला देखील त्याचे परिणाम भोगावे लागतात. विश्व तंबाखू निषेध दिवस पाळण्याचा मुख्य उद्धेश तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या प्राणघातक आजारांविषयी जनसामान्यांना जागृत करणे आणि लोकांना हे व्यसन सोडण्यास परावृत्त करणे असा आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे, श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी यांच्या मार्गदर्शनात विश्व तंबाखू निषेध दिवस आभासी पद्धतीने पाळण्यात आला. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. प्रमोद ब. निपाणे, अध्यक्ष, भारत स्वाभिमान, अंजनगाव सुर्जी, तसेच रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी श्री. केशव माकोडे, प्रा. डॉ. माला बारापात्रे यांची उपस्थिती लाभली.



कार्यक्रमादरम्यान प्रमुख वक्ते डॉ. प्रमोद ब. निपाणे यांनी आपल्या मार्गदर्शनात व्यसन व त्यांचे प्रकार, तंबाखूची भिषणता व प्रकार, तंबाखूतिल घातक रसायने तसेच तंबाखूचे दुष्परिणाम व त्यावरील उपाय, व्यसनमुक्तीचे धोरण आदींविषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान प्राचार्य चौबे यांनी उपस्थितांना विश्व तंबाखू निषेध दिवस जनजागृती निमित्य आभासी पद्धतीने शपथ दिली. यावेळी उपस्थितांनी शपथ ग्रहण केली. कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता प्रा. डॉ. संगीता जवंजाळ, डॉ. नितिन घोडीले (सहा. कार्यक्रम अधिकारी), कु. नविता मालाणी, श्री. चंद्रशेखर वडाळे, श्री. राजेंद्र मानकर, डॉ. सतिश मार्डीकर आदींचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्ग,तसेच रासेयो चे स्वयंसेवक, विद्यार्थी व विद्यार्थिनी आभासी पद्धतीने उपस्थित होते.

---

# Smt. Radhabai Sarda College Observe World No Tobacco Day

**Darypur - Mahesh Bunde** : Every year, on 31 may World Health Organization (WHO) observe World No Tobacco Day under different themes to spread awareness about the dangers of using tobacco. For this year WHO has launches a campaign "Commit to Quit" to observe day. While launching the campaign, it urged all countries to play their part by joining and creating tobacco free environment by spreading awareness among the people and support them to quit for good. National Service Scheme wing in the Smt. Radhabai Sarda College offered an online celebration of World No Tobacco Day-2021 on Monday, May 31, 2021 with strict adherence to the Government guidelines on COVID-19 Pandemic. Dr. Bashisth Choubey, Principal, Smt. Radhabai Sarda Arts, Commerce and Science College, Anjangaon Surji presided over the function. Dr. Pramod B. Nipane was the chief guest for the programme. NSS Programme Officer Mr. Keshav U. Makode and Prof. Dr. Mala Barapatre was also attendees for the programme. Dr. Nipane in his talk through light on the harmful ingredients associated with tobacco and smoking. He also talk about how health problems can be tackled when one quits smoking and about the opportunity to lead a healthier life. In this programme Dr. Choubey offers oath to the audience as a part of awareness campaign. The audient took the oath. The programme was attended by teaching and non-teaching staff of the college as well as NSS volunteer and college students were also participated in the programme. Prof. Dr. Sangita Jawanjal, Dr. Nitin Ghodile, Ms. Navita Malani, Mr. Chandrashekhar Wadale, Mr. Rajendra Mankar and Dr. Satish Mardikar worked for the success of this programme.



# श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

*जागतिक पर्यावरण दिवस (दि. ०५.०६.२०२१)*

---

### - प्रकाशित बातमी –


आपल्या तालुक्यातील प्रत्येक बातमी
e-EDITION
दि. १२ जुन २०२१
कार्यालय - मिराई प्रिंटर्स
सहकार नगर, बनोसा-दर्यापूर ४४४८०३
जनसामान्यांचे हक्काचे व्यासपिठ
साप्ताहिक वऱ्हाड दर्शन
Gmail - ravi85nawalkar@gmail.com
संपादक - रवि एच. नवलकार
9527414139 / 9021677302
मुलगी वाचवा... मुलगी शिकवा....


## श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालया तर्फे जागतिक पर्यावरण दिवस साजरा

अंजनगाव सुर्जी प्रतिनिधी

--------------------

संयुक्त राष्ट्राच्या इतिहासातील सर्वात मोठी जागरुकता मोहीम म्हणजेच जागतिक पर्यावरण दिन. वसुंधरेची चिंता असलेले, त्याची काळजी घेणारे अनेक पर्यावरणवादी घटक, संघटना, पर्यावरण प्रेमींकडून जागतिक पर्यावरण दिवस हा उत्साहाने साजरा करण्यात येत असतो. आज जगासमोर हवामान बदलाचं संकट उभं आहे. जागतिक तापमानात वाढ तसेच प्रदुषणाची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक ठिकाणची जंगले विकासाच्या नावाखाली उद्धवस्त केल्या जात आहेत. परिणामी नैसर्गिक साधनांचा ऱ्हास मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे पृथ्वीवरील सर्व सजिवांचं अस्तित्वच धोक्यात आलं आहे. जागतिक तापमान वाढ कमी करायची असेल आणि वाढत्या लोकसंख्येची अन्नसुरक्षा साधायची असेल तर या परिसंस्थांचं पुनुरुज्जीवन करणं अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्यामागे पृथ्वीची काळजी आणि तिला वाचवण्याची तळमळ आहे.

त्या अनुषंगाने श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे तसेच राजेश बुरंगे, संचालक, राष्ट्रीय सेवा योजणा, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या मार्गदर्शनात जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण दिवसाचे औचित्य साधुन राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे ऑनलाईन प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती.

ऑनलाईन प्रश्नमंजुषेत प्रथम क्रमांक आदित्य दिपकराव जोशी (बि.एस् सी. भाग-३), द्वितीय क्रमांक स्नेहित सुरेंद्र रसे (बि.एस् सी. भाग-१) व तृतिय क्रमांक कु. अदिती विजयपंत लोळे (बि.एस् सी. भाग-२) यांनी पटकाविला. सदर प्रश्नमंजुषेस महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा तसेच रा.से.यो. स्वयंसेवकांचा उत्स्फुर्त सहभाग लाभला.

जागतिक पर्यावरण दिवसानिमित्य आभासी प्रश्नमंजूषेच्या आयोजनाकरिता प्रा. डॉ. संगीता जवंजाळ, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी श्री. केशव माकोडे, प्रा. डॉ. माला बारापात्रे, डॉ. नितिन घोडीले (सहा. कार्यक्रम अधिकारी), श्री. चंद्रशेखर वडाळे, श्री. राजेंद्र मानकर आदींचे सहकार्य लाभले


दैनिक शासन अधिकार
शनिवार १२ जून २०२१
मुख्य संपादक नागेश उंबरकर
RNI / MAHMAR २०१४ /६२२०९
संपादक - सुरज देशमुख मो.९३२५२०२९५९ , शिव आईस फेट्री सी १७ सातुर्णा बडनेरा रोड अमरावती


## श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयातर्फे जागतिक पर्यावरण दिवस साजरा

अनंता मोहोड(प्रतिनिधी

अंजनगाव सुर्जी: संयुक्त राष्ट्राच्या इतिहासातील सर्वात मोठी जागरुकता मोहीम म्हणजेच जागतिक पर्यावरण दिन. वसुंधरेची चिंता असलेले, त्याची काळजी घेणारे अनेक पर्यावरणवादी घटक, संघटना, पर्यावरण प्रेमींकडून जागतिक पर्यावरण दिवस हा उत्साहाने साजरा करण्यात येत असतो. आज जगासमोर हवामान बदलाचं संकट उभं आहे. जागतिक तापमानात वाढ तसेच प्रदुषणाची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक ठिकाणची जंगले विकासाच्या नावाखाली उद्ध्वस्त केल्या जात आहेत. परिणामी नैसर्गिक साधनांचा ऱ्हास मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे पृथ्वीवरील सर्व सजिवांचं अस्तित्वच धोक्यात आलं आहे. जागतिक तापमान वाढ कमी करायची असेल आणि वाढत्या लोकसंख्येची अन्नसुरक्षा साधायची असेल तर या परिसंस्थांचं पुनुरुजीवन करणं अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्यामागे पृथ्वीची काळजी आणि तिला वाचवण्याची तळमळ आहे.त्या अनुषंगाने श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे तसेच राजेश बुरंगे, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या मार्गदर्शनात जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण दिवसाचे औचित्य साधुन राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे ऑनलाईन प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती. ऑनलाईन प्रश्नमंजुषेत प्रथम क्रमांक आदित्य दिपकराव जोशी (बि.एस् सी. भाग- ३), द्वितीय क्रमांक स्नेहित सुरेंद्र रसे (बि.एस् सी. भाग-१) व तृतिय क्रमांक कु. अदिती विजयपंत लोळे (बि.एस् सी. भाग-२) यांनी पटकाविला. सदर प्रश्नमंजुषेस महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा तसेच रा.से.यो. स्वयंसेवकांचा उत्स्फुर्त सहभाग लाभला. जागतिक पर्यावरण दिवसानिमित्य आभासी प्रश्नमंजूषेच्या आयोजनाकरिता प्रा. डॉ. संगीता जवंजाळ, रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी श्री. केशव माकोडे, प्रा. डॉ. माला बारापात्रे, डॉ. नितिन घोडीले ( सहा. कार्यक्रम अधिकारी) , श्री. चंद्रशेखर वडाळे, श्री. राजेंद्र मानकर आदींचे सहकार्य लाभले.

## श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

## *आंतरराष्ट्रीय योग दिवस (दि. २१.०६.२०२१)*

---

### - प्रकाशित बातमी –

RNI-MAHMAR/2014/62209
दैनिक
# शासन अधिकार
सर्वसामान्यांच्या प्रश्नासाठी झटणारे एकमेव ई-दैनिक
23/06/2021
संपादक -सुरज देशमुख
मुख्यसंपादक - नागेश उंबरकर | जाहीरात व्यवस्थापक - शुभम मेश्राम 9325202959 | 7066299872

## श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा



अंजनगाव सुर्जी: भारतीय धर्म संस्कृतीमधील "योग" संकल्पनेची मांडणी केलेली आहे. त्याच जोडीने भगवान पतंजली मुनी यांनी आपल्या योगसूत्राद्वारे मानवाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासाची संकल्पना स्पष्ट केली आहे. भारतीय प्राचीन संस्कृती, परंपरा यांमध्ये योग, योगासने, योगसाधना यांना अनन्य साधारण महत्त्व आहे. डिसेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभर साजरा करण्यात आला. याच परंपरेप्रमाणे यावर्षी २१ जून रोजी सातवा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. आताच्या घडीला संपूर्ण जगावर कोरोनाचे सावट असताना या वर्षीचा योग दिन "योगासह घरी रहा" या विशेष संकल्पनेतून साजरा करण्यात आला. या अनुषंगाने श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान समहाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथे राष्ट्रीय सेवा योजना, शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने ोमवार, दि. २१ जुन २०२१ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वशिष्ठ चौबे यांच्या मार्गदर्शनात सातव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान शारीरिक शिक्षण विभागाचे विभागप्रमुख डॉ. समिर बिजवे तसेच संकेत बंड व चेतन चंदनपत्री यांनी उपस्थितांना योगासनांची प्रात्यक्षिके व्यासपीठावरून सादर केले. त्यानुसार अनुकरण करत उपस्थितांनीं योगासने केलीत. कार्यक्रमादरम्यान प्राणायाम, ताडासन, वृक्षासन, वज्रासन, मकरासन, पवनमुक्तासन, शवासन व इतर योगासने करण्यात आली. यावेळी. प्रा. डॉ. संगीता जवंजाळ, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे, प्रा. डॉ. माला बारापात्रे, प्रा. डॉ. बिना राठी, डॉ. नितीन सराफ, प्रा. राजेंद्र मानकर, डॉ. नितीन घोडीले (सहा. कार्यक्रम अधिकारी) व आशा बानाईत आदींची उपस्थिती लाभली. जागतिक योग दिनाचे औचित्य साधून "मास टॅलेंट एक्सिबिशन ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड" या योगाविषयीच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाचा विदयार्थी चंदू चंदनपत्री याच्या यावेळी सत्कार करणाऱ्यात आला. यावेळी व्यासपीठावर डॉ. अनिल पितळे तसेच श्री. भास्कर म्हसाळ यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी श्री. नितीन वानखडे, प्रा. इंदल जाधव व सुनिल कुर्हेकर यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमादरम्यान कोविड-१९ विषयीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात आले.

**प्राचार्य श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती**

## श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती
## राष्ट्रीय सेवा योजना

*माझा गाव कोरोनमुक्त गाव" जनजागृती अभियान अंतर्गत दत्तक ग्राम वरूड खुर्द येथे*
*शालेय साहित्य, पशु आहार तसेच मुखाच्छादन व साबण वितरण (दि. २३.०६.२०२१)*

---

**- प्रकाशित बातमी –**

आपल्या तालुक्यातील प्रत्येक बातमी
जनसामान्यांचे हक्काचे व्यासपिठ
साप्ताहिक वऱ्हाड दर्शन
e-EDITION
दि. २४ जुन २०२१
कार्यालय - मिराई प्रिंटर्स
सहकार नगर, बनोसा-दर्यापूर ४४४८०३
संपादक - रवि एच. नवलकार
9527414139 / 9021677302
मुलगी वाचवा... मुलगी शिकवा....
Gmail - ravi85nawalkar@gmail.com

# श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयातर्फे रासेयो अंतर्गत

## 'माझा गाव, कोरोनामुक्त गाव' जनजागृती अभियान प्रारंभ

अंजनगाव सुर्जी : प्रतिनिधी

--------------------

आपल्या देशाचा सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडविण्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमाची महत्त्वाची भूमिका दिसून येते. महाविद्यालयीन युवकांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता व सामाजिक बांधिलकी रुजविण्याच्या उद्दिष्ठाने या उपक्रमा अंतर्गत विविध सामाजिक उपक्रम राबविल्या जातात. युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडवत असताना तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर या उपक्रमाद्वारे होते. 'माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी' (नॉट मी, बट यु) हे ब्रीदवाक्य लक्षात घेऊन स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान ठेवून समाजसेवेसाठी तत्पर असतो. आपले उज्वल भविष्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही देणे लागतो म्हणून फूल ना फुलाची पाकळी या माध्यमातून महाविद्यालयीन युवक कार्य करीत असतो. आजच्या घडीला संपूर्ण जग कोरोनासारख्या वैश्विक महामारीसोबत झुंजत आहे. यामध्ये माणसांनाच नव्हे तर पशूंनाही त्याचा परिणाम भोगावा लागत आहे. महामारीच्या प्रसाराला अटकाव करण्याच्या उध्दीष्ठाने केलेल्या उपाययोजनांमुळे रस्ते निर्मनुष्य झाले आहेत. त्याचाच परिणाम पशूंच्या खाद्य दैनंदिनीवर होतांना दिसत आहे.

संत गाडगे बाबांच्या दशसूत्री संदेशाप्रमाणे भुकेलेल्या पशूंना खाद्य तसेच गरीब मुलामुलींना शिक्षणास मदत करण्याच्या हेतूने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती तर्फे दत्तक ग्राम वरूड खुर्द येथे शालेय साहित्य, पशु आहार तसेच मुखाच्छादन व साबण वितरण करून माझा गाव, कोरोनामुक्त गाव जनजागृती अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे व उदघाटक म्हणून डॉ. राजेश बुरंगे, संचालक, रासेयो, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांची उपस्थिती लाभली. तसेच या कार्यक्रमादरम्यास श्री. रविभाऊ बोंद्रे (सरपंच, वरुडा खुर्द), श्री. पी. बी. मकेश्वर (ग्रामसेवक, वरुडा खुर्द) तसेच श्री धर्मराज बोंद्रे (उप सरपंच, वरुडा खुर्द), यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यांच्यासह यावेळी व्यासपीठावर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे व प्रा. डॉ. माला बारापात्रे यांची उपस्थिती लाभली.

डॉ. बुरंगे यांनी उदघाटनपर मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजनेची ध्येय व कार्य याविषयी सखोल मार्गदर्शन करुन महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सुरु केलेल्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. गेल्या वर्षीपासून सुरु झालेल्या ऑनलाईन शिक्षण प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाला खिळ बसल्यामुळे हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सेवाभावी वृतीला चालना देणारा ठरेल असे उदगार त्यांनी यावेळी आपल्या मार्गदर्शनात केले. कार्यक्रमादरम्यान गावातील नागरिकांना कोविड-१९ विषयीच्या माझा गाव कोरोनामुक्त गाव या जनजागृती अभियानास सहयोग करुन संपूर्ण लसीकरण करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी ग्रामस्थांना केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चौबे यांनी आपल्या मार्गदर्शनात महाविद्यालयतर्फे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत कोविड-१९ महामारी दरम्यान करण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रमांविषयी मार्गदर्शन केले व उपस्थितांना माझा गाव करोनमुक्त गाव या अभियानास सहयोग करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमादरम्यान दत्तक ग्राम वरुडा खुर्द येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, पशु आहार तसेच मुखाच्छादन व साबण वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. केशव माकोडे, संचालन कु. प्रणाली निपाणे व आभार प्रदर्शन डॉ. नितिन घोडीले (सहा. कार्यक्रम अधिकारी) यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अमोल कतोरे यांनी विद्यापीठ गीत सादर केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील श्री गोपालजी बागडी, प्रा. चंद्रशेखर वढाळे, डॉ. नितीन सराफ, प्रा. राजेंद्र मानकर, प्रा. रामचंद्र कुलकर्णी, डॉ. विवेक पाटील व श्री विलास तायडे आदींची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता रासेयो स्वयंसेवक कु. रक्षा वानखडे, प्रतीक निमकाळे, संकेत वालकडे, रोहित आठवले, सुमित ताथोड, रजत भोंग व विशाल वाघमारे तसेच वरुड खुर्द येथील सौ. मीरा बोंदरे (आशा वर्कर) व श्री. गोपाल बोंदरे यांचे सहकार्य लाभले.

# श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

***कोविड-१९ लसीकरण जनजागृती अभियान (दि. ०३.०७.२०२१)***

---

**- प्रकाशित बातमी –**

आपल्या तालुक्यातील प्रत्येक बातमी
e-EDITION
दि.०५ जुन २०२१
कार्यालय - मिराई प्रिंटर्स
सहकार नगर, बनोसा-दर्यापूर ४४४८०३
जनसामान्यांचे हक्काचे व्यासपिठ
साप्ताहिक वऱ्हाड दर्शन
संपादक - रवि एच. नवलकार
9527414139 / 9021677302
Gmail - ravi85nawalkar@gmail.com
मुलगी वाचवा... मुलगी शिकवा....

## श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत कोविड-१९ लसीकरण जनजागृती अभियान




बातमी संकलन – महेश बुंदे

--------------------

जगातील अनेक देशांमध्ये कोरोना लसीकरण मोहिम सुरु झाल्या असून भारतात सुद्धा कोविड–१९ लसीकरणास सुरुवात झालेली आहे. परंतु लसीकरणाविषयी जनता संभ्रमित असल्याचे दिसून येते. म्हणूनच महाराष्ट्र शासनातर्फे अनेक सेवाभावी संस्थांना, महाविद्यालयांना व समाजसेवकांना कोविड–१९ लसीकरणाविषयी जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी तर्फे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे यांच्या मार्गदर्शनात कोविड–१९ लसीकरण जनजागृती अभियान राबविण्यात आले.

कोविड–१९ लसीकरण जनजागृती अभियानादरम्यान रासेयो कार्यक्रम अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजना पथकातील स्वयंसेवक यांनी ग्रामीण रुग्णालय, अंजनगाव सुर्जी व लसीकरण केंद्र, नगर परिषद, अंजनगाव सुर्जी तसेच दत्तक ग्राम वरुड खुर्द येथे भेट देऊन लसीकरणाविषयी जनजागृती करण्यात आली. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे, प्रा. चंद्रशेखर वढाळे, प्रा. राजेंद्र मानकर तसेच डॉ. नितीन घोडीले (सहा. कार्यक्रम अधिकारी) आदींची यावेळी उपस्थिती लाभली. कोविड–१९ लसीकरण जनजागृती अभियानादरम्यान केंद्रावर उपस्थित नागरिकांना भौतिक अंतर पाळण्याचे आवाहन करून मुखाच्छादन वाटण्यात आले.

यावेळी कार्यक्रमादरम्यान कोविड –१९ विषयीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात आले. या जनजागृती मोहिमेस रवी बोंदरे (सरपंच, वरुड खुर्द), धर्मराज बोंदरे तसेच रासेयो स्वयंसेवक सुमित ताथोड, रजत भोंग, विशाल वाघमारे, अजिंक्य चिकटे व तेजस पटेल आदींचे सहकार्य लाभले.

## श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत कोविड-१९ लसीकरण जनजागृती अभियान



अंजनगाव सुर्जी दि. ४ : जगातील अनेक देशांमध्ये कोरोना लसीकरण मोहिम सुरु झाल्या असून भारतात सुद्धा कोविड-१९ लसीकरणास सुरुवात झालेली आहे. परंतु लसीकरणाविषयी जनता संभ्रमित असल्याचे दिसून येते. म्हणूनच महाराष्ट्र शासनातर्फे अनेक सेवाभावी संस्थांना, महाविद्यालयांना व समाजसेवकांना कोविड-१९ लसीकरणाविषयी जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी तर्फे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे यांच्या मार्गदर्शनात कोविड-१९ लसीकरण जनजागृती अभियान राबविण्यात आले.

कोविड-१९ लसीकरण जनजागृती अभियानादरम्यान रासेयो कार्यक्रम अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजना पथकातील स्वयंसेवक यांनी ग्रामीण रुग्णालय, अंजनगाव सुर्जी व लसीकरण केंद्र, नगर परिषद, अंजनगाव सुर्जी तसेच दत्तक ग्राम वरुड खुर्द येथे भेट देऊन लसीकरणाविषयी जनजागृती करण्यात आली. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे, प्रा. चंद्रशेखर वढाळे, प्रा. राजेंद्र मानकर तसेच डॉ. नितीन घोडीले (सहा. कार्यक्रम अधिकारी) आदींची यावेळी उपस्थिती लाभली. कोविड-१९ लसीकरण जनजागृती अभियानादरम्यान केंद्रावर उपस्थित नागरिकांना भौतिक अंतर पाळण्याचे आवाहन करून मुखाच्छादन वाटण्यात आले. यावेळी कार्यक्रमादरम्यान कोविड -१९ विषयीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात आले. या जनजागृती मोहिमेस रवी बोंदरे (सरपंच, वरुड खुर्द), धर्मराज बोंदरे तसेच रासेयो स्वयंसेवक सुमित ताथोड, रजत भोंग, विशाल वाघमारे, अजिंक्य चिकटे व तेजस पटेल आदींचे सहकार्य लाभले.

# श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

### *पशु आरोग्य तपासणी शिबीर (दि. ०७.०७.२०२१)*

---

**- प्रकाशित बातमी –**

आपल्या तालुक्यातील प्रत्येक बातमी
e-EDITION
दि. ०८ जुलै २०२१
कार्यालय - मिराई प्रिंटर्स
सहकार नगर, बनोसा-दर्यापूर ४४४८०३
जनसामान्यांचे हक्काचे व्यासपिठ
साप्ताहिक वऱ्हाड दर्शन
Gmail - ravi85nawalkar@gmail.com
संपादक - रवि एच. नवलकार
9527414139 / 9021677302
मुलगी वाचवा...
मुलगी शिकवा....

# श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयातर्फे रासेयो अंतर्गत पशु आरोग्य तपासणी शिबीर आयोजित

बातमी संकलन : महेश बुंदे

--------------------

महाविद्यालयीन युवकांचा शैक्षणिक विकास घडत असतांनाच युवकांमध्ये सामाजिक व सांस्कृतिक विकास घडविण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना कार्य करीत असते. या उपक्रमा अंतर्गत विविध सामाजिक कार्यक्रम राबवून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न महाविद्यालय स्तरावर होत असतो. आजच्या घडीला संपूर्ण जग कोरोनासारख्या वैश्विक महामारीसोबत झुंजत असून माणसांसोबतच पशूंच्याही आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम जाणवत आहे. दरवर्षी ऋतु बदलामुळे पावसाळ्या प्रारंभी उद्भवणाऱ्या रोगांपासून पशूंचे रक्षण करण्याकरीता लसीकरण व तत्सम उपाय योजना करणे अत्यावश्यक असते. राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीदवाक्य 'माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी' (नॉट मी, बट यु) व संत गाडगे बाबांच्या दशसूत्री संदेश लक्षात घेऊन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे व डॉ. राजेश बुरंगे, संचालक, रासेयो, सं.गा.बा.अम. विद्यापीठ, अमरावती यांच्या मार्गदर्शनात श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सूर्जी तर्फे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत दत्तक ग्राम वरुड खुर्द येथे शेतकऱ्याच्या पशुंकरिता पशु आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे, डॉ. शरद झोंबाडे (पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पं. स. अंजनगाव सुर्जी), डॉ. भालचंद बोरसे, श्री. रवि पाटील बोंद्रे (सरपंच, वरुड खुर्द) तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे यांची उपस्थिती लाभली.



प्राचार्य डॉ. चौबे यांनी आपल्या मार्गदर्शनात पशु आरोग्य तपासणी शिबीर आयोजनामागचा राष्ट्रीय सेवा योजनेचा हेतू व महाविद्यालयाने कोरोना महामारी दरम्यान महाविद्यालयांमार्फत केल्या गेलेल्या सामाजिक कार्याचा आढावा सांगत दत्तक ग्राम वरुड खुर्द येथिल नागरिकांना सदर शिबिरामध्ये पशु चिकित्सा करून घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमादरम्यान श्री. रवि पाटील बोंद्रे (सरपंच, दत्तक ग्राम वरुड खुर्द) यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पशु आरोग्य तपासणी शिबीरा दरम्यान डॉ. शरद झोंबाडे, डॉ. भालचंद बोरसे, डॉ. सागर बारब्दे, डॉ. अंकित जुनघरे, श्री. मदन तेलगोटे (पशुविमा), श्री. विनोद पोटे या चमूने सेवा दिली. शिबिरादरम्यान दत्तक ग्राम वरुड खुर्द येथील शेतकऱ्याच्या एकूण ५० पेक्षा जास्त पशुंची तपासणी करून लसीकरण करण्यात आले. शिबिरादरम्यान शेतकऱ्यांना पशूंकरिता मिनरल मिक्चर पावडर, कॅल्शियम इंजेकशने, गोचीड औषध, प्राण्यांच्या पचन संस्थेविषयीच्या रोगांवरील औषधे व इतर प्रकारची आवश्यक औषधे उपलब्ध करून देण्यात आली. कार्यक्रमादरम्यान कोविड-१९ विषयीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात आले.

पशु आरोग्य तपासणी शिबीर आयोजनाकरिता प्रा. चंद्रशेखर वढाळे (गणित विभागप्रमुख), प्रा. राजेंद्र मानकर (भौतिकशात्र विभागप्रमुख), प्रा. डॉ. माला बारापात्रे (कार्यक्रम अधिकारी), डॉ. नितीन घोडीले (रासेयो, सहा. कार्यक्रम अधिकारी) तसेच दत्तक ग्राम वरुड खुर्द येथील श्री धर्मराज बोंद्रे (उप सरपंच, वरुड खुर्द), सौ. मीरा बोंद्रे, कु. गायत्री बोंद्रे, रासेयो स्वयंसेवक प्रतिक निमकाळे, रजत भोंग व अजिंक्य चिकटे यांचे सहकार्य लाभले.

## श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

### *नेत्र तपासणी शिबीर (दि. २३.०७.२०२१)*

---

### - प्रकाशित बातमी –

आपल्या तालुक्यातील प्रत्येक बातमी
जनसामान्यांचे हक्काचे व्यासपिठ
e-EDITION
साप्ताहिक वऱ्हाड दर्शन
दि. २२ जुलै २०२१
संपादक - रवि एच. नवलकार
9527414139 / 9021677302
कार्यालय - मिराई प्रिंटर्स
सहकार नगर, बनोसा-दर्यापूर ४४४८०३
Gmail - ravi85nawalkar@gmail.com
मुलगी वाचवा... मुलगी शिकवा....

# श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन

## नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

बातमी संकलन – महेश बुंदे

--------------------

राज्यामध्ये डोळ्यांचे आजार विशेषतः मुकर मायकोसिस सारख्या रोगाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी तर्फे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे व डॉ. राजेश बुरंगे, संचालक, रासेयो, सं.गा.बा.अम. विद्यापीठ, अमरावती यांच्या मार्गदर्शनात दत्तक ग्राम वरुड खुर्द येथे शुक्रवार, दि. २३ जुलै २०२१ रोजी सकाळी १० वाजता नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबीरात जिल्हा रुग्णालय, अमरावती तसेच ग्रामीण रुग्णालय, अंजनगाव सुर्जी येथील डॉक्टरांची चमू सेवा देणार आहेत. मुकर मायकोसिस सारख्या रोगाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेत नेत्र तपासणी शिबीर आयोजित करून महाविद्यालयातर्फे परिसरातील नागरिकांना शिबिरामध्ये नेत्र तपासणी करण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वशिष्ठ चौबे व रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे, प्रा. डॉ. माला बारापात्रे, डॉ. नितीन घोडीले यांनी केले आहे. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकातर्फे महाविद्यालयीन दर्शनी भागात तसेच दत्तक ग्राम वरुड खुर्द येथे भित्तिपत्रकांचे अनावरण करून जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी




नागरिकांना नेत्र तपासणी शिबीरामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील गणित विभागप्रमुख प्रा. चंद्रशेखर वढाले, भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. राजेंद्र मानकर, डॉ. सतिश मार्डीकर, श्री. गजानन मंडवे, पुष्कर सारडा, तसेच दत्तक ग्राम वरुड खुर्द येथील श्री. रवि पाटील बोंद्रे (सरपंच, दत्तक ग्राम वरुड खुर्द), रासेयो स्वयंसेवक तुषार किचंबरे, नागेश सदाफळे तसेच शिवनाथ इंगळे आदींची उपस्थिती लाभली.

आपल्या तालुक्यातील प्रत्येक बातमी
जनसामान्यांचे हक्काचे व्यासपिठ
e-EDITION
साप्ताहिक वऱ्हाड दर्शन
दि. २५ जुलै २०२१
संपादक - रवि एच. नवलकार
9527414139 / 9021677302
कार्यालय - मिराई प्रिंटर्स
सहकार नगर, बनोसा-दर्यापूर ४४४८०३
Gmail - ravi85nawalkar@gmail.com
मुलगी वाचवा... मुलगी शिकवा....

# नेत्र तपासणी शिबीर संपन्न ...!

बातमी संकलन – महेश बुंदे

-----------------




श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथील राष्ट्रीय सेवा योजना मार्फत दत्तक ग्राम वरुड खुर्द येथे नेत्र तपासणी शिबीराचे उदघाटन दि. २३ जुलै रोजी सकाळी ११. ३० वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे यांच्या हस्ते व डॉ. वासुदेव गणोरकर, जिल्हा सामान्य रुग्णालय, इर्विन हॉस्पिटल, अमरावती, श्री. रवि पाटील बोंद्रे (सरपंच, वरुड खुर्द), श्री. गोपालजी बागडी, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

# श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

***रासेयो दिनानिमित्त ई - पिक पाहणी मार्गदर्शन कार्यशाळा: (दि. २८.०९.२०२१)***

---

**- प्रकाशित बातमी –**


आपल्या तालुक्यातील प्रत्येक बातमी
e-EDITION
दि. ३० सप्टेंबर २०२१
कार्यालय - मिराई प्रिंटर्स
सहकार नगर, बनोसा-दर्यापूर ४४४८०३
जनसामान्यांचे हक्काचे व्यासपिठ
साप्ताहिक वऱ्हाड दर्शन
Gmail - ravi85nawalkar@gmail.com
संपादक - रवि एच. नवलकार
9527414139 / 9021677302
मुलगी वाचवा... मुलगी शिकवा....


## श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयात रासेयो दिनानिमित्त ई - पिक पाहणी मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

बातमी संकलन – महेश बुंदे

--------------------

शेतजमिनीच्या उताऱ्यांवर पिकांची नोंद करण्याची पद्धत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन, शेत जमिनीची प्रतवारी, दुष्काळ, अतिवृष्टी किंवा वादळामुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज लावणे शक्य होते. या पीक नोंदणीच्या आधारे शेतकऱ्यांना पीक कर्जही दिले जाते. परंतु दोन–तीन गावांमिळुन किंवा त्याहीपेक्षा जास्त गावांमिळून एकच तलाठी असल्याने पीक पाहणी अचूक नोंदवली जात नाही, त्या कारणाने बऱ्याचदा शेतकऱ्यांचे नुकसान होते ही बाब लक्षात घेत आता महसूल विभागाने शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांची अरिअल टाइम नोंदणी करता यावी या उद्देशाने महसूल विभाग, महाराष्ट्र शासन तर्फे मोबाइल अप्लिकेशन द्वारे ई–पिक पाहणी नोंदविण्यासाठी सुविधा थेट शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे. शेतकऱ्यांमध्ये सदर बाबींविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथक व महसूल विभाग, तहसिल कार्यालय, अंजनगाव सुर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये ई – पिक पाहणी मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. अभिजित जगताप, तहसिलदार, अंजनगाव सुर्जी हे होते. या वेळी व्यासपीठावर प्रा. डॉ. बीना राठी, विभागप्रमुख इंग्रजी विभाग तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे, प्रा. डॉ. माला बारापात्रे व मंडळ अधिकारी श्री पिंपळकर आदींची प्रामुखाने उपस्थिती लाभली. कार्यक्रमादरम्यान तहसिलदार श्री. जगताप यांनी दृकश्राव्य पद्धतीने माहितीपटाचे सादरीकरण करून उपस्थितांना महसूल विभाग, महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या सोयीकरिता उपलब्ध केलेल्या ई – पिक पाहणी ॲप ची संपूर्ण हाताळणी व कार्यपद्धतीचे सविस्तर माहिती सांगितली. राष्ट्रीय सेवा योजनेचे घोषवाक्य नॉट मी, बट यु या वाक्याला अनुसरून त्यांनी



उपस्थित स्वयंसेवकांना सदर माहिती च्या आधारे आपल्या परिसरातील शेतकऱ्यांना ई – पिक पाहणी ॲप विषयी येणाऱ्या अडचणींबाबत मदत करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी व्यासपीठावरून केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चौबे यांनी आपल्या मार्गदर्शनात ई – पिक पाहणी ॲप शेतकऱ्यांसाठी मदत करणारे असून या विषयी महाविद्यालयातील प्रत्येक घटकांनी याविषयी जनजागृती करण्याचे आवाहन यावेळी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे यांनी तर आभार प्रदर्शन सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. नितीन घोडीले यांनी केले. या कार्यक्रमास मंडळ अधिकारी श्री. पिंपळकर, तलाठी श्री. आर. एल. गवई व श्री. प्रशांत कोंडावार, कोतवाल श्रीमती रजनी शर्मा व श्री. सुमेध सावळे आदींची प्रामुख्याने उपस्थिती लाभली. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता प्रा. राजेंद्र मानकर, प्रा. इंदल जाधव, श्री. संतोष सरोदे, श्री. सुनिल कुर्हेकर श्रीमती अर्चना चव्हाण, श्री. सुनिल बेलसरे, सौ. छाया नायडकर तसेच रासेयो स्वयंसेवक प्रतिक निमकाळे, अकदस सुफी, सुमित ताथोड, विशाल वाघमारे आदींचे सहकार्य लाभले.

# श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

***कोविड-१९ लसीकरण शिबीर: (दि. १३.१०.२०२१)***

---

## प्रकाशित बातमी

पुण्य नगरी

# राधाबाई सारडा महाविद्यालयात कोरोना लसीकरण शिबिर

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी



**अंजनगाव सुर्जी :** येथील श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना, युवा स्वास्थ्य मिशन समिती, राष्ट्रीय छात्र सेना, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विभाग व ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने कोरोना लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले.

शिबिराला तहसीलदार अभिजित जगताप, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुधीर डोंगरे, महेंद्र गिरी, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे, प्रा. डॉ. माला बारापात्रे, प्रा. डॉ. नितिन सराफ आदींची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. शिबिराला ग्रामीण रुग्णालयाचे जावेद खान, प्रतिमा वारुळे, स्वाती खोडे व भाग्यश्री पाटील तसेच डॉ. सुजाता आठवले, भास्कर म्हसाळ, प्रा. चंद्रशेखर वडाळे, प्रा. राजेंद्र मानकर, डॉ. अंशुमती पेंडखरे, शरद देशमुख, प्रा. थोरात, दीपक लांडे, डॉ. पवन राऊत आदींचे सहकार्य लाभले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी नितिन गोमासे, डॉ. नितीन घोडीले, डॉ. अनिकेत भुयार, डॉ. सतिश मार्डीकर, संतोष सरोदे, प्रतिक निमकाळे, नागेश सदाफळे, आनंद गवई, तुषार किचंबरे, सुनील बेलसरे आदींचे सहकार्य लाभले.

**Smart Amravati**
Page No.2 November 01, 2021

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
|| श्रीकृष्णम् वंदे जगद्गुरुम् ||
आता रोज रहा अपडेट!
अध्ययन समाचार
संपादक : जितेंद्र रोडे
SOCIAL MEDIA EDITION
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा, जि. अमरावती 444 805
भ्रमणध्वनी : 9422158005
दुरध्वनी : 07223-222005
jitendrarode77@gmail.com
Adhayayn Samachar
बुधवार दि.१३ ऑक्टोंबर २०२१

# श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयात कोविड-19 लसीकरण शिबीर संपन्न

**अं.सुर्जी दि.१४ जयेंद्र गाडगे**



जगातील अनेक देशांमध्ये कोरोना लसीकरण सुरु झाल्या नंतर भारतातसुद्धा कोविड-१९ लसीकरणाने वेग पकडला आहे. महाराष्ट्र शासनातर्फे अनेक सेवाभावी संस्थांना, महाविद्यालयांना व समाजसेवकांना कोविड-१९ लसीकरणाविषयी जनजागृती व लसीकरण शिबीर आयोजन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या अनुषंगाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्टीय छात्र सेना (एन.सी.सी.) व ग्रामीण रुग्णालय, अंजनगाव सुर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथे कोविड-१९ लसीकरण शिबीर आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. अंशुमती पेंडोखरे, प्रा. डॉ. संगीता जवंजाळ, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुधिर डोंगरे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे, प्रा. डॉ. माला बारापात्रे, ग्रामीण रुग्णालय, अंजनगाव सुर्जी येथील स्वाती खुळे व भाग्यश्री पाटील, रासेयो स्वयंसेवक नागेश सदाफळे व तुषार किचंबरे आदींची यावेळी उपस्थिती लाभली. कोविड-१९ लसीकरण शिबिरादरम्यान ग्रामीण रुग्णालय, अंजनगाव सुर्जी येथील डॉक्टर चमूने सेवा दिली. शिबीरादरम्यान महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिकांनी लसीकरण करून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कोविड-१९ लसीकरणादरम्यान केंद्रावर उपस्थित नागरिकांना भौतिक अंतर पाळण्याचे व कोविड -१९ विषयीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता प्रा. चंद्रशेखर वढाळे, प्रा. राजेंद्र मानकर तसेच डॉ. नितीन घोडीले (सहा. कार्यक्रम अधिकारी), प्रा. ममता येवतकर, प्रा. कु. कोरडे, प्रशांत नांदुरकर, संतोष सरोदे, प्रल्हाद लोयते, विलास तायडे, पुष्कर सारडा तसेच सुनिल बेलसरे आदींचे सहकार्य लाभले.

**श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती**

**राष्ट्रीय सेवा योजना**

**"राष्ट्रीय मतदार दिवस- २५ जानेवारी"**

**मंगळवार, दि. २५ जानेवारी २०२२**

---

**-प्रकाशित बातमी-**

# राधाबाई सारडा महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जनजागृती

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अंजनगाव सुर्जी** ▪ श्रीमती रााबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वशिष्ठ चौबे यांच्या मागादर्शानात राष्ट्रीय मतदार औचित्य साधून जनजागृती अभियान राबविण्यात आले.

याप्रसंगी आयोजित कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रा.डॉ.माला बारापात्रे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे, प्रा. सुरेंद्र किन्हीकर, विभागप्रमुख राज्यशास्त्र विभाग तसेच प्रा. महेंद्र गिरी आदींची उपस्थिती लाभली.

प्राचार्या प्रा. डॉ. माला बारापात्रे यांनी उपस्थितांना मतदानाची शपथ दिली् राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शपथ ग्रहण केली. याप्रसंगी भास्कर म्हसाळ, प्रा. डॉ. ताई उके, भारती कोरडे, कॅप्टन. नितीन वानखडे, गोपाल बागडी आदींची उपस्थिती लाभली. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धा निबंध स्पर्धा, भित्तीपत्रक स्पर्धा अश्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकररता डॉ. पनपतन घोडीले (रासेयो सहा. कार्यक्रम अधिकारी), प्रा. नविता मालाणी, अनिल ताडे, दिनकर चव्हाण, तसेच रासेयो स्वयंसेवक प्रफुल काळमेघ आदिंचे सहकार्य लाभले.




ePaper देशोन्नती
Fri, 28 January 2022
https://deshonnati.digitaleditior

# श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

*राष्ट्रीय ग्राहक दिवस: (दि. १५.०३.२०२२)*

---

**-प्रकाशित बातमी-**


आपल्या तालुक्यातील प्रत्येक बातमी

e-EDITION

दि. १६ मार्च २०२२

कार्यालय - मिराई प्रिंटर्स
सहकार नगर, बनोसा-दर्यापूर ४४४८०३

जनसामान्यांचे हक्काचे व्यासपिठ

साप्ताहिक वऱ्हाड दर्शन

Gmail - ravi85nawalkar@gmail.com

संपादक - रवि एच. नवलकार
9527414139 / 9021677302


मुलगी वाचवा... मुलगी शिकवा....

# श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयात रासेयो अंतर्गत जागतिक ग्राहक हक्क दिवस साजरा

अंजनगाव सुर्जी तालुका प्रतिनिधी

--------------------

जगभरात ग्राहक हक्क आणि गरजांबद्दल जागरूकता वाढवण्याचे एक साधन म्हणून तसेच ग्राहकांच्या हक्कांचा आदर आणि संरक्षण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी १५ मार्च हा दिवस 'जागतिक ग्राहक हक्क दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो. भारतात राष्ट्रीय ग्राहक दिवस हा दरवर्षी २४ डिसेंबर ला साजरा केला जातो. ग्राहकांना हक्काची जाणीव व्हावी आणि तो बाजारात खरेदीच्या हक्काबाबत सक्षम व्हावा. ग्राहकाने वस्तू खरेदी करताना कुठल्याही आमिषाला बळी न पडता वस्तूची पारख नीटनेटकी करून खरेदी घ्यावी. याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक ग्राहक हक्क दिन दरवर्षी विविध संकल्पनेतून साजरा केला जातो. यावर्षी जागतिक ग्राहक हक्क दिवस 'फेअर डिजिटल फायनान्स' या संकल्पनेतून साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे यांच्या मार्गदर्शनात जागतिक ग्राहक हक्क दिवस साजरा करून जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रा.डॉ. संगीता जवंजाळ, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे, प्रा. डॉ. माला बारापात्रे तसेच डॉ. नितिन घोडीले (रासेयो सहा. कार्यक्रम अधिकारी) व डॉ. विवेक पाटील आदींची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमादरम्यान प्रा. डॉ. जवंजाळ यांनी ग्राहकांना वस्तू खरेदीबाबत असलेले अधिकार यांविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात गिऱ्हाकांचा सुरक्षेचा हक्क, माहितीचा हक्क, निवड




करण्याचा अधिकार तसेच तक्रार निवारण करून घेण्याचा हक्क आदींविषयी सखोल मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना आपल्या हक्कांविषयी व अधिकारांविषयी जागृत केले. कार्यक्रमाचे प्रस्तावित प्रा. केशव माकोडे यांनी केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात कार्यक्रम आयोजनामागची भूमिका विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन राहुल र. इंगळे यांनी तर आभार प्रदर्शन कु. गायत्री दूरतकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता प्रा. चंद्रशेखर वडाळे, प्रा. राजेंद्र मानकर तसेच रासेयो स्वयंसेवक निलेश धुमाळे, प्रियंका सुलतान, शेख जुनेद, गायत्री राऊत, पायल गोंडचर, प्रगती पारवे, तेजस घडेकर, गणेश रामेकर तसेच रासेयो पथकातील इतर स्वयंसेवकांचे सहकार्य लाभले.

**श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती**

**राष्ट्रीय सेवा योजना**

***जागतिक जल दिन: (दि. २२.०३.२०२२)***

---

**-प्रकाशित बातमी-**



# रासेयो पथकातर्फे पक्ष्यांकरिता ठिकठिकाणी जलपात्रांची सोय



## श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयाचा उपक्रम

**अंजनगाव सुर्जी (ता.प्र.)** दिवसेंदिवस उन्हाची तिव्रता वाढत चालली आहे. परिणामी जंगलातील नैसर्गिक पानवटे पाण्याअभावी कोरडे पडत असून, वाढते तापमान व पिण्याच्या पाण्याची गैरसोय यामुळे पक्षांचे हाल होत आहेत. निसर्गाशी नाते असलेल्या छोट्या पक्ष्यांचा किलबिलाट परिसरात सदैव राहावा तसेच त्यांचे संरक्षण व्हावे यानिमित्याने जागतिक जल दिनाचे औचित्य साधून श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकातर्फे महाविद्यालयीन परिसरात पक्षांकरिता वृक्षांवर मातीची भांडी अडकविण्यात आली. सदर संकल्पनेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे यांचे मार्गदर्शन लाभले.

जागतिक जल दिनानिमित्य नैसर्गिक जलसाठा व त्याचे महत्व याविषयी विद्यार्थ्यांना जल संचयाचे महत्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पक्षीमित्रांच्या आवाहनाला प्रतिसाद देत राष्ट्रीय सेवा योजना पथकातील स्वयंसेवकांना जल संवर्धन तसेच पक्षी संवर्धनाचे उद्दिष्ट ठेऊन स्वयंसेवकांनी आपल्या परिसरात किंवा घरीच पक्षांकरिता अन्न-पाण्याची व्यवस्था करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमा दरम्यान रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे, प्रा.डॉ.माला बारापात्रे, प्रा.डॉ.नितीन सराफ, डॉ. नितीन घोडीले, प्रा. चंद्रशेखर वडाळे, प्रा.राजेंद्र मानकर आदिंची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता रासेयो स्वयंसेवक प्रथमेश निचळ, क्षितिज गीते, शुभम दांडगे, पवन गावंडे, शेख ... निमक... श्रेयश लो... प्रि... बोडखे, सु... घडे... व हर्षल थोरात आदांचे सहकार्य लाभले.